शिक्षण उपसंचालक
पुणे-१,
23 JUL
आवक नोंदवही क्रमांक

महाराष्ट्र शासन
क्रमांक: नमाशा १००४/(४०७/०४)/माशि-१
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ जुलै, २००४

प्रति,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

विषय : परवानगी देण्यात आलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळेत प्रत्यक्षात सुरु असलेल्या वर्गांना परवानगी देणेबाबत.

ज्या संस्थांना इयत्ता १ ली व इयत्ता ८ वीचा वर्ग सुरु करण्यास शासनाने ज्यावर्षी परवानगी दिली आहे, त्यावर्षी प्रत्यक्षात त्या शाळेमध्ये इयत्ता १ ली बरोबरच इयत्ता २ री, ३ री किंवा ४ थी चे वर्ग सुरु असल्यास, त्याचप्रमाणे इयत्ता ८ वी बरोबरच इयत्ता ९ वी किंवा १० वीचे वर्ग सुरु असल्यास, अशा शाळांना संबंधित संस्थेने विनंती केल्यास त्या शैक्षणिक वर्षामध्ये शैक्षणिक सुविधा व इतर बाबी विचारात घेऊन त्या वर्गांना कायम विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्याचे अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालकांना राहातील.

२. अशा प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालकांनी संबंधित संस्थांनी उक्त स्वरुपाच्या वर्गांना परवानगी देण्याची विनंती केल्यास जास्तीत जास्त १५ दिवसांच्या आंत परवानगी देण्याबाबत निर्णय घ्यावा.

२१/७/०४
( मा. आ. गुट्टे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत
१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,
४) कार्यासन प्राशि-३, शालेय शिक्षण विभाग
५) निवड नस्ती, कार्यासन माशि-१ / प्राशि-३

43-C:\karmarkar\letter-407-04--mashi-1